# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-6465145/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-6465145

**E-mail : ronagpur.dte@gmail.com** **Website: rdtenagpur.org.in**


**क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/ FC/2017/** 1214

**दिनांक:-** 9 MAY 2017

प्रति,

प्राचार्य,

सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/ पदवीका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

विषय:- शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता व्यावसायिक पदवीका अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियांसाठी प्रवेश **सुविधा केंद्र (Facilitation Centre)** करीता अर्ज सादर करण्याबाबत.

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्रक्र.10/एडीएम/पदविका/एएफसी/2017/3364, दि. 03/05/2017

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता ज्या संस्थेत अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/ पदवीका अभ्यासक्रम सुरू आहेत अशा संस्थांनी व्यावसायिक पदवीका अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियांसाठी **प्रवेश सुविधा केंद्र (Facilitation Centre)** मिळणेकरीता ज्या संस्थाना नव्याने अर्ज करावयाचा आहे त्यानी दिनांक 16/05/20107 पर्यत संस्थेच्या लेटर हेडवर या कार्यालयास अर्ज सादर करावेत.

दिनांक 16/05/20107 नंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

सोबत:- संदर्भिय पत्र

सहसंचालक

तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,

नागपूर

C:\kadam\Fc. director Letter 2016-17.doc

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602. 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharasthra.gov.in


अत्यंत महत्वाचे

क्र.10/एडीएम/पदविका/एएफसी/2017/ ३३६४

दि. - 3 MAY 2017

प्रति.

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

**विषय :- शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियांसाठी प्रवेश सुविधा केंद्र (Facilitation Centre) ठरविण्याबाबत...**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, 2015 दि. 17.8.2015 नुसार महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खा0जगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित तदनुषंगिक बाबीसाठी "प्रवेश नियामक प्राधिकरण" आणि "शुल्क नियामक प्राधिकरण" या दोन प्राधिकरणांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरणांतर्गत राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष निर्माण केलेला आहे. या अधिनियमातील तरतुदीनुसार सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेमार्फत एक खिडकी पध्दतीने सामायिक प्रवेश परिक्षेव्दारे प्रवेश करण्याचे शासनाचे धोरण आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उमेदवारांना नोंदणी (रजिस्ट्रेशन) व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी **प्रवेश सुविधा केंद्र (Admission Facilitation Centre)** जाहीर करणे आवश्यक आहे. Facilitation Centre म्हणुन गत शैक्षणिक वर्षात प्रथम व थेट व्दितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी व प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका अभ्यासक्रमांसाठी ज्या संस्था कार्यरत होत्या तसेच पुर्वी FC म्हणुन कार्यरत नसलेल्या ज्या संस्थांनी प्रवेश सुविधा केंद्र मिळावे म्हणुन संचालनालयाकडे अथवा विभागीय कार्यालयांकडे अर्ज केले असतील अशा संस्थांनाही विभागीय कार्यालयांनी शिफारस केल्यास FC म्हणुन मान्यता देण्यात येईल. गत शैक्षणिक वर्षातील FC केंद्राची यादी सोबत जोडली आहे.

गत शैक्षणिक वर्षात सोबत जोडलेल्या यादीतील एखादया संस्थेकडुन FC केंद्र म्हणुन कार्यरत असताना संस्थेकडुन गंभीर चुका झाल्या असतील जसे **तक्रार, न्यायालयीन प्रकरणे इत्यादी** तर त्याबाबतची माहिती संचालनालयास कळविण्यात यावी. तसेच पुर्वी FC म्हणुन कार्यरत नसलेल्या ज्या संस्थांनी संचालनालयाकडे अथवा विभागीय कार्यालयांकडे प्रवेश सुविधा केंद्र (Admission Facilitation Centre) मिळावे म्हणुन अर्ज केले असतील अशा संस्थांची माहिती आपल्या **अभिप्रायासह शिफारस** या संचालनालयास पाठविण्यात यावी.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील प्रथम व थेट व्दितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी व प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उमेदवारांना नोंदणी (रजिस्ट्रेशन) व कागदपत्रे पडताळणीचे काम सुरु करावयाचे असल्याने केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेसाठी AFC निश्चित करण्याकरिता आपल्या विभागातील संस्थांची नावे **दिनांक 20.05.2017 पर्यंत** या संचालनालयास पाठविण्यात यावीत.

(डॉ. सुभाष महाजन)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

प्रत:- मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांना माहितीस्तव.